पुणे सहकारी दूध उत्पादक संघावर राष्ट्रवादीची सत्ता! सर्व जागा जिंकल्या

पुणे - पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वच्या सर्व जागा जिंकून आपली सत्ता मिळाली आहे. जिल्हा दूध संघ संचालक मंडळाच्या १६ जागा आहेत. यापैकी उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवसापर्यंत पाच जागा बिनविरोध झाल्या होत्या. या निवडणुकीतील उर्वरित ११ जागांसाठी २५ उमेदवार निवडणूक आखाड्यात होते. या निवडणुकीसाठी आंबेगाव, भोर, दौंड, खेड, जुन्नर, शिरूर, मावळ, पुरंदर आणि वेल्हे या नऊ तालुक्यांत १०० टक्के मतदान झाले होते. जिल्ह्यातील मुळशी आणि हवेली या दोन तालुक्यांचा अपवाद वगळता उर्वरित ९ तालुक्यांत पैकीच्या पैकी मतदान झालेले. आज सकाळी नऊ वाजता मतमोजणी सुरू झाली. मतमोजणीनंतर लगेचच निकाल जाहीर झाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व उमेदवार विजयी झाले. या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष विष्णू हिंगे आणि विद्यमान उपाध्यक्षांचे पती कालिदास गोपाळघरे विजयी झाले आहेत.

किन्हवली सहकारी संस्थेची निवडणूक होताच ९ संचालकांनी धरली भाजपाची वाट

■ शहापूर

किन्हवली विकास सेवा सहकारी संस्थेची बिनविरोध निवडणूक होताच ९ संचालकांनी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या उपस्थित भारतीय जनता पक्षाची वाट धरल्याने किन्हवली विकास सेवा सहकारी संस्थेत भाजपचा झेंडा रोवला गेला. तालुक्यातील किन्हवली, वाचकोले, शिवाजीनगर, बाभळे, नायकाचापाडा या ५ गावांतील शेतकऱ्यांची किन्हवली विकास सेवा सहकारी संस्था आहे. या सेवा सहकारी संस्थेची निवडणूक बिनविरोध झाली असून आज शहापुरच्या सहाय्यक निबंधक कार्यालयात अध्यासी अधिकारी संजय ठाकरे यांच्या उपस्थित चेअरमन व व्हाईस चेअरमनपदाची निवडणूक पार पडली. संस्थेवर पुन्हा एकदा चेअरमन म्हणून महेश पतंगराव ते व्हाईस चेअरमन म्हणून किसन आवार यांची बिनविरोध निवड झाली.

निवडणूक पार पडताच महेश पतंगराव, किसन आवार, बबन दिनकर, पांडुरंग साबळे, मोरेश्वर मलिक, चिंतामण कारले, मंगेश पवार, जयश्री आवार, छाया पतंगराव या संचालकांनी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस सुभाष हरड यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या उपस्थित मुरबाड येथे जाऊन भारतीय जनता पार्टीचा झेंडा हातात घेतला. (सहकाराच्या माध्यमातून किन्हवली परिसरातील शेतकऱ्यांचा विकास करण्यासाठी आम्ही सर्वांनी भाजपची वाट धरली आहे, अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित चेअरमन महेश पतंगराव यांनी दिली.

प्रमोद सावंत यांची दुसऱ्यांदा गोव्याच्या मुख्यमंत्रिपदी निवड

■ पणजी

गोव्याच्या मुख्यमंत्रिपदी दुसऱ्यांदा प्रमोद सावंत यांची निवड करण्यात आली आहे. आज पत्रकार परिषदेत तशी घोषणा करण्यात आली. आज गोवा विधिमंडळ पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्रिपदासाठी कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होते याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कारण विश्वजित राणे हेसुद्धा मुख्यमंत्रिपदाचा दावेदार होते. दरम्यान, या बैठकीला पर्यवेक्षक म्हणून उपस्थित असलेले केंद्रीयमंत्री तोमर यांनी उपस्थित भाजपा आमदारांना कोणाला विधिमंडळ पक्षाचा नेता बनवायचे याबाबत विचारले असता विश्वजित राणे यांनीच प्रमोद सावंत यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला आणि त्याला सर्व आमदारांनी अनुमोदन दिले. त्यामुळे प्रमोद सावंत हे दुसऱ्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री झाले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ते साखळी मतदारसंघातून निवडून आले आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजपने विधानसभा निवडणूक लढविली होती.

जाहीर सूचना

याद्वारे सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, आम्ही १) नाझिया मोह. फारूक शेख, राहणार ए-१, ७०४, रोज नगर सीएचएस लि., काळसेकर रुग्णालयासमोर, कौसा, मुंब्रा, ठाणे - ४००६१२ आणि २) शबनम आरिफ शेख, राहणार सदनिका क्र. १०१, सी-विंग, सागर अपार्टमेन्ट, इमारत - बी, डॉ. असादुल्ला खान शाळेजवळ, चांद नगर, कौसा, मुंब्रा, ठाणे - ४००६१२ याद्वारे खालीलनुसार घोषित करतो;

की, महसूल गाव-भांडुप, तालुका-कुर्ला एमएसडीच्या सर्व्हे क्र. १६५ (भाग) सुसंगत सीटीएस क्र. ८८(भाग), टिक्का क्र. ३, ४, ८ आणि ९ (भाग) धारण केलेल्या क्षेत्रफळ मोजमाप अदमासे १८१०० चौ.यार्ड्स समतूल्य १५१३५ चौ.मीटर्स किंवा साधारण तेवढेच जमिनीच्या खंड आणि तुकड्यांच्या संदर्भात आम्ही कुटुंबातील इतर सदस्यांसह मालक आणि जमीनदार आहोत.

की, हे जाहिररित्या सूचित करण्यात येते की, आमचे खरे काका श्री. रेहमत हुसैन खान पठाण यांनी फसवणूक आणि दबावाखाली दिनांक ०७.०९.२०१५ रोजी सामंजस्य करार बनविला होता आणि खोटी आश्वासने आणि चुकीच्या अनुमानांवर अधिकार/मुखत्यारपत्राचा चुकीचा दावा करताना आढळले आहेत, ज्याकरिता याद्वारे असे घोषित करण्यात येते की, श्री. रेहमत हुसैन खान पठाण यांच्या नावे आमच्याकडून प्राप्त केल्याचा दावा असलेले सदर दिनांक ०७.०९.२०१५ रोजीचा सामंजस्य करार आणि सर्व किंवा कोणतेही कथित मुखत्यार पत्र रद्द होत आहे / मागे घेण्यात आले आहे / समाप्त करण्यात आले आहे आणि आता जाहिररित्या असे जाणीव करून देण्यात येते की, श्री. रेहमत हुसैन खान पठाण यांना कोणत्याही प्रकारे सौ. नाझिया मोह. फारुक शेख आणि सौ. शबनम आरिफ शेख यांचे प्रतिनिधित्व करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत.

पुढे असे घोषित करण्यात येते की, आमच्या नावे आणि/किंवा उपरोल्लिखित मुखत्यार पत्राच्या आधारे केलेले किंवा बनविलेले कोणतेही किंवा सर्व कृत्य ही आमची कृत्ये मानली जाणार नाहीत तसेच आमच्या नावे किंवा आमच्या वतीने केली जाणार नाहीत ज्या संदर्भात संबंधित त्यांच्या स्वतःच्या जोखीम, खर्च आणि परिणामांवर जबाबदार आणि पात्र असतील.

दिनांक : २२.०३.२०२२
ठिकाण: मुंबई

सही/-
नाझिया मोह. फारुक शेख
आणि शबनम आरिफ शेख

अजित पवार- सुधीर मुनगंटीवार यांच्यात शिवजयंतीवरून विधानसभेत खडाजंगी

■ मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार जयंती साजरी होत आहे. मात्र, यावरून विधानसभेत चांगलीच खडाजंगी झाली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तिथीनुसार जयंती साजरी करण्यावरून भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुद्दा उपस्थित केला. शिवजयंती तिथीनुसार साजरी करण्यावर विचार करण्याची मागणी यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी केली. त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी करत आहेत. मात्र, राज्याचे अधिकारी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती साजरी करतात. तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी न करण्यावर विचार करावा. सुधीर मुनगंटीवार यांच्या या मागणीला अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, सुधीर मुनगंटीवार अर्थमंत्री असताना कधीही तिथीनुसार जयंती साजरी झाली नाही. कधीही फोटो लावण्यात आला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जन्मतारीख किंवा तिथीचा वाद घालण्यापेक्षा ते आपले सगळ्यांचे दैवत आहे, हे त्रिवार सत्य आहे. पाठिमागच्या काळात आघाडीच्या सरकारने माजी मंत्री स्व. रामकृष्ण मोरे यांनी इतिहासात महाराजांचा जन्म कधी झाला याचा शोध लावून १९ फेब्रुवारी १९३० ही तारीख निश्चित केली होती. तेव्हापासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिवनेरी येथे शिवजयंती साजरी करत आहेत. आजतागायत सर्वच मुख्यमंत्र्यांनी ही प्रथा सुरू ठेवली. सरकारच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.

तसेच, ते पुढे म्हणाले की, आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षाचे प्रमुख म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यांच्यासह शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व इतर पक्षाच्या आमदारांनीदेखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. विधीमंडळाच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आहे. ज्यांना अभिवादनासाठी जायचे असेल त्यांनी जाऊन अभिवादन करावे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.

कळव्याच्या शिवशक्ती नगरात सिलिंडरचा स्फोट! ४ जखमी

■ ठाणे

घरगुती गॅस सिलिंडर कंपनीच्या एजन्सीमध्ये सिलिंडरचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना कळवा येथील शिवशक्ती नगरात रविवारी रात्री ११.३० च्या सुमारास घडली. या घटनेत ४ कामगार जखमी झाले असून सत्यम यादव (२०), अनुराज सिंह (१९), रोहीत यादव (२०), गणेश यादव (१९) अशी जखमींची नावे आहेत. हे सर्वजण ८० ते ९० टक्के भाजले आहेत. त्यांच्यावर कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कळवा पूर्व परिसरातील शिवशक्ती नगरात घरगुती गॅस सिलिंडर कंपनीच्या एजन्सीमध्ये सिलिंडरचा स्फोट झाल्याने परिसरला जोरदार हादरला बसला. स्फोटानंतर एजन्सीमध्ये आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले होते. त्यानंतर काही क्षणात जवानांनी ही आग विझवली. मात्र दुदैवाने तोपर्यंत सर्व कामगार ८० ते ९० टक्के भाजले. या कामगारांना कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

जाहिर निवेदन

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

डोंबिवली विभागामधील ठेकेदारांना सुचित करण्यात येते की, निविदेसोबत जमा केलेली कार्यदेशानुसार संबंधित ठेकेदारांच्या देयकातून दि.३१/०३/२०१९ पर्यंतच्या कालावधींची सुरक्षा ठेव (रोख, ऑनलाइन अथवा देयकातून वळते केलेली) व अनामत रक्कम (रोख अथवा ऑनलाइन) डोबिवली विभाग या कार्यालयास जमा आहे. सदर रक्कमेच्या परताव्यासाठी ठेकेदारांनी त्याचा अर्ज त्यासोबत लागणारे कागदपत्र या कार्यालयास दि. ०५/०४/२०२२ पर्यंत सादर करावेत. अन्यथा सदर ठेकेदारांची सुरक्षा ठेव रक्कम व अनामत रक्कम ही म.रा.वि.वि.कं.मर्यादित च्या नियमानुसार कंपनीच्या खात्यात जमा करण्यात येईल. तसेच मुदतीनंतर केलेला दावा देय असणार नाही याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
डोंबिवली विभाग.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या पात्र बोलीदारांद्वारे साईटला भेट आणि योग्य व्यासंगाचे आयोजन करण्याकरिता अंतिम दिनांकाचा विस्तार

सदर वृत्तपत्रामध्ये दि. ०३.०३.२०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट ऋणको)च्या ४३/४ आणि ४३/५, गावः सावरसाई, पेण-खोपोली रोड, पेण-रायगड, महाराष्ट्र - ४०२१०७ येथील (निर्दिष्ट ठिकाण) मालमत्तांच्या (जमीन आणि प्लान्ट व मशिनरी) विक्रीकरिता ई-लिलावासाठीच्या जाहीर सूचनेच्या पुढे, येथे सूचित करण्यात येते की, साईटला भेट आणि योग्य व्यासंगाचे आयोजन करण्याकरिता अंतिम दिनांक **२७.०३.२०२२** पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्रक्रिया कागदपत्राच्या बाबतीतील इतर वेळमर्यादा त्यानुसार वाढलेली/सुधारित असेल. यासंदर्भात, संपूर्ण तपशिलाकरिता कृपया कॉर्पोरेट ऋणकोची वेबसाईट https://ksspetron.in/liquidation.html येथे अपलोड करण्यात आलेले प्रक्रिया प्रपत्र, आवृत्ती १.१ दिनांक २१.०३.२०२२ चा संदर्भ घ्यावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) करिता
सही/-
सीएस विनीत के. चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: **IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246**
liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापकाचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९
दूरध्वनी: ०११-४९१२१६४४-४५
दिनांक: २२.०३.२०२२
ठिकाण: नवी दिल्ली

PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL COURT, SENIOR DIVISION THANE AT THANE

Civil M.A. No. 237 of 2022

Petition for Probate of the Last Will and Testament of Late Mr. Shoukatali Nabisaheb Momin, having address at Bul Bul Co-Operative Housing Society Ltd. Flat No. 12, 2nd Floor, Plot No. 50, Sector 9A, Vashi, Navi Mumbai -400 703.

.... Deceased

MD.Umar Nasruddin Maner, residing at Flat No.12, 13, Bul Bul Co-Operative Housing Society Ltd., 2nd Floor, Plot No. 50, Sector 9A, Vashi, Navi Mumbai 400 703.

.... Petitioner

That late Mr. Shoukatali Nabisaheb Momin, uncle of the Petitioner MD.Umar Nasruddin Maner, late Mr. Shoukatali Nabisaheb Momin expired on 7th June 2021,

The said deceased leaving behind his following property: -

'Flat No.12, Bul Bul Co-Operative Housing Society Ltd., 2"d Floor, Plot No. 50, Sector 9A, Vashi, Navi Mumbai 400 703

Where the above-named Petitioner has filed Mis. Application for granting probate under Indian succession act before the Hon'ble civil court (S.D) at Thane.

You the members of Public are hereby given notice to appear in the court of the Civil Court (S.D) Thane, in person or pleader duly instructed and to file same objection in any within 30 days, from the date of publication of this public notice. Failing which the said application will be held presuming that there is no objection of anybody and the application will be finally decided

Dated: 22/3/2022
Sd/-
Thane Jr. Clerk

Seal by Order
Sd/-
Asst. Superintendent
Civil Judge (S.D.)

उत्तराखंडच्या मुख्यमंत्रिपदी धामींच्या नावावर शिक्कामोर्तब

मुंबई : उत्तराखंड विधानसभा निवडणुकीत भाजपने मोठा विजय मिळवल्यानंतर उत्तराखंडच्या मुख्यमंत्रिपदी पुष्कर सिंह धामी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. देहरादून येथे विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. त्यानंतर पर्यवेक्षक केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि उपपर्यवेक्षक मीनाक्षी लेखी यांनी पुष्कर सिंह धामी यांच्या नावाची घोषणा केली आहे. दरम्यान, उत्तराखंडच्या मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत पुष्कर सिंह धामी, सतपाल महाराज, माजी केंद्रीय मंत्री रमेश पोखरियाल निशंक, खासदार अनिल बलूनी यांची नाव चर्चेत होती. मात्र, पुष्कर सिंह धामी या शर्यतीत अग्रभागी राहिले आणि राजनाथ सिंह यांनी मुख्यमंत्रिपदाची माळ धामी यांच्या गळ्यात घातली. तर राजनाथ सिंह यांनी पुष्कर धामी यांचे अभिनंदन करत धामी यांना सरकार चालवण्याचा अनुभव आहे.

बांगलादेशात मालवाहू जहाजाला धडकून संपूर्ण बोट बुडाली! ६ ठार! १०० बेपत्ता

■ ढाका

बांगलादेशची राजधानी ढाका बाहेरील नारायणगंज जिल्ह्यात एका बोटीला दुसऱ्या मोठ्या जहाजाची धडक बसल्याने बोट पाण्यात बुडाली असून, या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० हुन अधिक बेपत्ता आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, नारायणगंज जिल्ह्यातील शीतलाख्या नदीत मालवाहू जहाज एमव्ही रुपोशी-९ या मालवाहू जहाजाने एमव्ही अफसरूद्दीन या बोटीला धडक दिली. या घटनेचा व्हिडियो देखील समोर आला असून, या घटनेत मोठे जहाज छोट्या बोटीला काही मीटरपर्यंत खेचत नेत असल्याचे समोर आले आहे. त्यानंतर बोट उलटते, असे देखील यात स्पष्ट दिसत आहे.

बोट उलटण्याआधी बोटीतील काही लोकांनी नदीत उड्या मारल्याचे देखील व्हीडिओद्वारे दिसत आहे. दरम्यान, या घटनेनंतर २ मुले आणि एका पुरुषासह ६ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता झालेल्यांची संख्या १००हुन अधिक आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बांगलादेशच्या नदी पोलिसांनी मालवाहू जहाज एमव्ही रुपाशी-१९ ताब्यात घेतले आणि त्याचा मालक आणि इतर ८ क्रू सदस्यांना ताब्यात घेतले.

मंजुरी मिळाल्यानंतरही एलआयसीचा अद्ययावत मसुदा पुन्हा सेबीकडे पाठवला

नवी दिल्ली- आर्थिक वर्ष २०२१-२२ संपायच्या आत एलआयसीचा आयपीओ येण्याची शक्यता होती. त्यासाठी सेबीचीही मंजुरी मिळाली होती. मात्र, शेअर बाजारातील अस्थिर वातावरणामुळे सरकारनेही आयपीओची निश्चित तारीख घोषित केली नाही. दरम्यान, एलआयसीचा अद्ययावत मसुदा पेपर पुन्हा एकदा बाजार नियामक मंडळाकडे (सेबी) पाठवण्यात आला आहे.

डिसेंबर तिमाही निकालांशी संबंधित माहिती या मसुद्यात असल्याचं एका अधिकाऱ्याने सांगितले. सेबीने नुकतेच एलआयसीचा आयपीओ आणण्यासाठी ग्रीन सिग्नल दिला होता. सरकारने १३ फेब्रुवारी रोजी सेबीकडे आयपीओसाठी रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस मसुदा दाखल केला होता, ज्याला या महिन्याच्या सुरुवातीला सेबीची मंजुरी मिळाली होती. त्यानुसार १२ मेपर्यंत वेळ होता. मात्र, आता आयपीओ आणण्यासाठी सरकारला सेबीकडे काही नवी कागदपत्रे सादर करावी लागली आहेत. नव्या माहितीनुसार, एलआयसीला ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत २३५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला होता. तर, एप्रिल ते डिसेंबर २०२१ दरम्यान निव्वळ नफा वाढून रु. १,६७१.५७ कोटी झाला. सरकारला आयपीओतून सुमारे ३१६ कोटी शेअर्स किंवा एलआयसीमधील पाच टक्के शेअर्स विकून सुमारे ६०,००० कोटी रुपये उभे करायचे आहेत.

जाहीर नोटीस

कळविण्यात येते की, झोपडा नं.२८० (जुना नं.३३३) विठ्ठल मंदिरजवळ, मकदुमशाह चहाच्या दुकानाच्या समोर, ३री साखळी स्ट्रीट, ई वॉर्ड, म्युनिसिपल, भायखळा (प.), मुंबई - ४०००००८ हे श्री. कुरबान अली यांनी २ व्यक्तींना विकले आहे. (१) **श्री.सोहराबली वहाबली शेख (छंगा)** (२) **श्री.हमीद अली खैराती शेख (प्रधान)** यांना विकले आहे. असे कळून आले आहे की, यापैकी श्री. सोहराबली वहाबली शेख (छंगा) यांनी हे झोपडे स्वतःचे मालकीचे आहे असे सांगून विकत आहे. त्याकरिता त्यांनी श्री. हमीद अली खैराती शेख (प्रधान) यांची कोणतीही ना हरकत घेतलेली नाही. तरी असे कळविण्यात येते आहे की, जो कोणी सदर झोपडे खरेदी करेल त्यास तो स्वतः जबाबदार राहील. कारण सदर झोपडे हे ज्वाइन्ट प्रॉपर्टी आहे.

सही/-
(सैयद रावी अब्बास)
वकील, उच्च न्यायालय,
मो.नं. ९८६७८६२६५६.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given the certificate (s) for the under mentioned securities of **BLACK ROSE INDUSTRIES LTD** having its registered office **145/A, MITTAL TOWER, NARIMAN POINT, MUMBAI 400021** has/have been lost/mislaid and the undersigned holder(s) of the said securities has/have applied to the company to issue duplicate certificate (s).

Any person who as claim in respect of the said securities should lodge such claim with the company at its Regd. Office within 15 days from this date, else the company will proceed to issue duplicate certificate(s) without further intimation.

Name of Holder(s) (and Jt.Holder,s if any)	Kind of securities and Face value	No. of securities	Distinctive NO(s)
PRAVIN BABULAL SHAH **NITIN BABULAL SHAH**	**EQUITY SHARES**	**100**	**788381 to 788481**

Place - MUMBAI
Date - 21-3-2022

PRAVIN BABULAL SHAH
NITIN BABULAL SHAH

e-TENDER NOTICE – 0104 / 2021–22

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in**

e-Tender No.	RFX No.	Particulars of Work / Supply	Estt. Cost Rs. (In Lakhs)
TN0994 AHP1 Refloated	3000026777	Procurement of various types of ball valves and plug valves for AHP-I.	6.80
TN0995 TM1	3000026728	Procurement of freon-22 gas for a.c. plant unit 1 to 4, service building & WT Plant.	9.64
TN0996 BM1	3000026735	Repair, reconditioning, balancing of worn out pa fan ndv 18 tiefstack impeller shaft assembly & id fan impeller assembly of unit no. 1 & 2 on as and when required basis.	24.85
TN0997 C&I2 Refloated	3000026679	Supply of level transmitters for dry ash silo system at unit-5(1x500MW) khaperkheda tps.	12.45
TN0998 CHP2 Refloated	3000026678	Revamping of gear box b3-315 for belt conveyor system in CHP-II, 500mw Khaperkheda TPS.	14.19
TN0999 TM1	3000026861	Procurement of generator rotor seal ring for unit no. 2.	5.70
TN1000 OS1 Refloated	3000026872	Annual work contract for turbine side housekeeping work and running of cycle cum scooter & car stand of unit no. 1 to 4, Khaperkheda TPS.	165.47

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M), MSPGCL, TPS Khaperkheda

जाहीर सूचना

गाळा क्र. १ ते १४, दयासागर इंडस्ट्रीयल इस्टेट, गोडदेव रोड, भाईंदर (पूर्व) - ४०१ १०५ येथे व्यवसाय करणारी भागिदारी संस्था **मे. पियानो प्रेसिटेल,** जे खाली नमूद केलेल्या गाळ्यांच्या तारणांच्या बदल्यात **कॅनरा बँक, मिड कॉर्पोरेट शाखा, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे पश्चिम - ४००६०४** यांच्याकडून कर्ज घेऊ इच्छित आहेत, त्यांच्या वतीने तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमधील नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्हा ठाणे आणि गाव गोडदेव, भाईंदर (पूर्व), ता. आणि जि. ठाणे येथे स्थित असलेल्या आणि वसलेल्या जुना सर्व्हे क्र. ६२, नवीन सर्व्हे क्र. १०४, हिस्सा क्र. ४ धारण केलेल्या जमिनीच्या सर्व खंड आणि तुकड्यांवर बांधलेल्या "**दयासागर इंडस्ट्रीयल इस्टेट**" या इमारतीमधील तळ मजल्यावर असलेले (१) गाळा परिसर क्र. २ आणि ३ए मोजमाप १८५१ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ (म्हणजेच १७२.०२ चौ. मीटर्स बिल्ट-अप क्षेत्रफळ), आणि (२) गाळा परिसर क्र. ३६ ए/१, मोजमाप १२१८ चौ.फू. बिल्ट अप क्षेत्रफळ (म्हणजेच ११३.१८ चौ.मीटर्स बिल्ट-अप क्षेत्रफळ)

असे सूचित करण्यात आले आहे की, उपरोल्लेखित गाळ्यांच्या संदर्भातील खालील मूळ लिंक शीर्षक करारपत्रे हरवली/गहाळ झाली आहेतः

गाळा क्र. २ आणि ३एः

१) मे. दयासागर बिल्डर्स (बिल्डर्स) आणि जिवनभाई बी. पटेल फॅमिली ट्रस्ट (खरेदीदार) (गाळा क्र. २) यांच्या दरम्यान आणि द्वारे बनविलेले दि. ०४.०८.१९७८ रोजीचे मूळ करारपत्र.
२) मे. दयासागर बिल्डर्स (बिल्डर्स) आणि जिवनभाई बी. पटेल फॅमिली ट्रस्ट (खरेदीदार) (गाळा क्र. ३ए) यांच्या दरम्यान आणि द्वारे बनविलेले दि. २९.१०.१९७८ रोजीचे मूळ करारपत्र.
३) जिवनभाई बी. पटेल फॅमिली ट्रस्टचे विश्वस्त श्री. दिलिप जिवनभाई पटेल, सौ. सिताबेन जिवनभाई पटेल आणि सौ. वासंती दिलीप पटेल (विक्रेते) आणि मे. वेल-मोर होम डेकोर प्रायव्हेट लिमिटेड, त्यांचे प्रवर्तक श्री. हेमंत नरसी शाह यांच्या द्वारे (खरेदीदार) यांच्या दरम्यान आणि द्वारे बनविलेले दि. १२.०३.१९८८ रोजीचे कराराचे मूळ लेख.

गाळा क्र. ३६ ए/१:

१) श्री. मगनलाल रूपचंद शाह (विक्रेते) आणि मे. वेल-मोर होम डेकोर प्रा. लि. (खरेदीदार) यांच्या दरम्यान आणि द्वारे बनविलेले दि. १२.१०.१९८८ रोजीचे कराराचे मूळ लेख.
२) मे. दयासागर बिल्डर्स (बिल्डर्स) आणि मे. ऑक्सीटेक्स इंडस्ट्रीज (खरेदीदार) यांच्या दरम्यान आणि द्वारे बनविलेले दि. ०६.०६.१९७८ रोजीचे मूळ करारपत्र.

सदर गाळे, म्हणजेच गाळा क्र. २ आणि ३ ए आणि गाळा क्र. ३६ ए/१च्या बाबतीत विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, मालकी, भाडेकरू, धारणाधिकार, वहिवाट परवाना किंवा अन्य कोणत्याही मार्गे कोणताही दावा/आक्षेप असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून **सात (७) दिवसांच्या** कालावधीमध्ये लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना कळवावे.

दिनांकः २२ मार्च, २०२२.

लिगलआय व्हेंचर,
ॲडव्होकेट - उच्च न्यायालय
२५५ आणि २५६, 'व्ही मॉल' साईधामच्या शेजारी,
ठाकूर कॉम्प्लेक्स,कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१.

मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

निविदा सूचना

म्हाडा
MHADA

कार्यकारी अभियंता डी-२ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा/मुं.म.पा./सा.बां.विभाग/के.सा.बां.वि/ रेल्वे/बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून तक्त्यातील स्तंभ क्रं.१० खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु.	ईसारा रक्कम रु.	सुरक्षा अनामत रक्कम	कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा रु.)	कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ	मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ	काम करावयाचा कालावधी	ठेकेदाराचा नोंदणी वर्ग
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१)	इ. क्र. १९ रतन बिल्डींग वाडीया स्ट्रीट मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत (**मंडळामार्फत काम**)	७,७३,३६०/-	७७३४.००	१६०००.००	५९०.००	दि. २३/०३/२०२२ ते दि.३०/०३/२०२२ सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यत	३१/०३/२०२२ सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यत	१५ महिने	७ व त्यावरील

१) कोऱ्या निविदा म्हाडा/ मुं.म.पा / सा.बां. विभाग /के.सां.बा.वि/ रेल्वे/ बीपीटी,. अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
२) कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग, मुं. इ दु. व पु. मंडळ, ८९-९५, रजनी महल, ताडदेव रोड, मुंबई-३४, यांचेकडून क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदाची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृत केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ८ मधील शेवटच्या दिवशी शक्य झाल्यास कार्यकारी अभियंता/डी-२ विभाग,मुं. इ. दु. व पु. मंडळ,यांच्या कार्यालयात सायंकाळी ३.०० वाजता उघडल्या जातील.
३) सविस्तर निविदा सुचनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे निविदा सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार लखोटा बंद निविदा सादर कराव्यात व नमुद केलेल्या शर्तीनुसार.
४) ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नांव समाविष्ट नसल्याबाबतचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
५) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/- च्या स्टॅप पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
६) इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत /शेडयुल बॅकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी **मुख्य लेखाधिकारी,** मुं.इ.दु. व.पू.मंडळ यांच्या नावावर द्यावी.
७) जर निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीपेक्षा कमी दराचा असेल तर त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय दिनांक २६/११/२०१८ नुसार अथवा **DTP** मध्ये नमुद केल्यानुसार गणना करुन धनाकर्ष (**Demand Draft**) अतिरीक्त सुरक्षा रक्कम म्हणून सादर करावा.
८) संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
९) जर निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा-यांनी अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसाच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल. अतिरीक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर सुचना पहावी.
१०) या कामासाठी अशाच प्रकारच्या इमारत बांधकामाचा / वास्तु बांधकामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेला अभियंता (सीव्हील इंजीनियर) आणि इतर आवश्यक देखरेख अधिकारी ठेकेदाराकडे असणे आवश्यक आहे.
११) उप ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्याकडील साधने / साधन संपत्ती विचारात घेतली जाणार नाही. १२) एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येत आहे.
१३) जी.एस.टी. अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासन वस्तु व सेवा कायदा २०१७ अन्वये अप्रत्यक्ष कर जसे वॅट , विक्रीकर इत्यादिच्या ऐवजी वस्तु व सेवा कर असा बदल झालेला आहे. त्यामुळे असे अप्रत्यक्ष कर निविदा मध्ये सेवा वस्तु कर म्हणून संबोधण्यात येईल, वस्तू व सेवा कर नोंदणी आवश्यक राहील तसेच वस्तु व सेवा कर देयकामधुन प्रचलित दराने कापण्यात येईल.

सही/-
कार्यकारी अभियंता,
डी-२/ मुं. इ.दु. व पु. मंडळ.

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
CPRO/A/143